# जालना शहर महानगरपालिका,जालना

प्रशासकीय ईमारत, गांधी चौक ते रेल्वेस्टेशन रोड,

जुना जालना,जालना ४३१२०३

फोन नंबर – ०२४८२-२३०३५०

| | | |
|---|---|---|
| जाक्र/जाशम/माव तं वि/२०२६/३८ | comcjalna@gmail.com | दिनांक-२९.०७.२०२६ |

## निविदा सूचना

निविदा क्रमांक: जाक्र/जाशम/मावतवि/२०२६/३८

### कामाचे नाव

**जालना शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, आयुक्त सभा व इतर कार्यक्रमांचे YouTube, Facebook वर थेट प्रक्षेपण (Live Streaming) करण्याकरिता अनुभवी एजन्सी / तज्ञ तांत्रिक व्यक्ती / संस्था यांची नियुक्ती करणे बाबत.**

| | |
|---|---|
| **कालावधी / Duration** | एक वर्ष |
| **अंदाजे खर्च / Estimated Cost** | ₹ 5,00,000/- (अंकांत: पाच लाख रुपये) |
| **निविदा शुल्क / Tender Fee** | ₹ 500/- (अपरिवर्तनीय) |
| **EMD रक्कम / EMD Amount** | ₹ 5,000/- |
| **निविदा प्रकार / Tender Type** | Open Tender |
| **Tender Portal** | https://jcmcjalna.org |

## जालना शहर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, आयुक्त सभा व इतर कार्यक्रमांचे YouTube, Facebook वर थेट प्रक्षेपण (Live Streaming) करण्याकरिता अनुभवी एजन्सी / तज्ञ तांत्रिक व्यक्ती / संस्था यांची नियुक्ती करणे बाबत.

### भाग - १: प्रस्तावना व पार्श्वभूमी

जालना शहर महानगरपालिका (यापुढे 'मनपा' असे संबोधण्यात येईल) ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत स्थापित एक वैधानिक संस्था असून जालना शहरातील नागरिकांना पायाभूत सुविधा व सेवा पुरविण्याचे कार्य करते.

शासनाच्या पारदर्शकता धोरणानुसार व नागरिकांना सुशासनाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने, मनपाच्या सर्वसाधारण सभा, विशेष सभा, आयुक्त सभा व इतर महत्त्वाच्या कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) YouTube व Facebook या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर करण्याचे मनपाने निश्चित केले आहे.

या कार्यासाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम, अनुभवी आणि विश्वासार्ह अशा एजन्सी / संस्था / व्यक्ती यांची नियुक्ती करण्याकरिता सदर निविदा सूचना प्रसिद्ध केली जात आहे.

### भाग - २: निविदा वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील / Particulars | दिनांक व वेळ / Date & Time |
|---|---|---|
| १ | निविदा प्रकाशन तारीख | 22/ 07/2026, सकाळी 11:00 वाजता |
| २ | निविदाधारकांनी निविदा सादर करणे | 22/ 07/2026, सकाळी 11:00 वाजता |
| ३ | Pre-Bid Meeting | / 07 /2026, दु. 12:00 वाजता – आयुक्त कक्ष |
| ४ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | 28/ 07/2026, सायं. 02:00 वाजेपर्यंत |
| ६ | निविदा उघडणे कालावधी | 28 / 07/2026, सायं. 03:00 वाजता |
| ७ | निविदा शुल्क भरणे | रु. 500/- निविदा सादर करण्यापूर्वी |
| ९ | इसारा रक्कम भरणे | रु. 5000/- डि.डि. स्वरूपात |

### भाग - ३: पात्रता निकष (Eligibility Criteria)

**निविदाकारांनी खालील सर्व पात्रता निकष पूर्ण करणे अनिवार्य आहे:**

#### ३.१ आर्थिक पात्रता

- निविदाकाराची मागील तीन आर्थिक वर्षांची (2023-24, 2024-25, 2025-26) सरासरी वार्षिक उलाढाल किमान ₹ 3,00,000/- (तीन लाख रुपये) असणे आवश्यक आहे.
- CA प्रमाणित Balance Sheet व Profit & Loss Statement सादर करावे.

#### ३.२ तांत्रिक पात्रता

- निविदाकाराला Live Streaming / Video Production क्षेत्रात किमान १ (एक) वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.
- YouTube व Facebook Live Streaming तांत्रिक ज्ञान व अनुभव असणे आवश्यक आहे.

- 4K/Full HD Camera, Live Encoder, Professional Mixer व अन्य तांत्रिक उपकरणे स्वतःकडे असणे किंवा नियमित वापरावर उपलब्ध असणे आवश्यक आहे.
- किमान ३ तांत्रिक कुशल कर्मचारी (Cameraperson + Streaming Technician + Audio Technician) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

### ३.३ कायदेशीर पात्रता

- निविदाकार हा भारतातील नोंदणीकृत Proprietorship / Partnership Firm / LLP / Private Ltd / Public Ltd कंपनी असावा.
- GST नोंदणी
- PAN Card अनिवार्य आहे.
- निविदाकाराविरुद्ध कोणत्याही सरकारी संस्थेने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
- कोणत्याही न्यायालयात फौजदारी किंवा दिवाणी खटला प्रलंबित नसावा (Self-Declaration) सादर करावे).

## भाग - ४: कामाचे स्वरूप व तांत्रिक आवश्यकता

### ४.१ आवश्यक सेवांचा तपशील

निवडलेल्या एजन्सीला खालील कामे करावी लागतील:

1. जालना मनपाच्या सर्व सर्वसाधारण सभा (General Body Meetings) यांचे Live Streaming करणे - साधारणतः वर्षातून १२ सभा.
2. विशेष सभा (Special Meetings), Emergency Meetings यांचे थेट प्रक्षेपण करणे - आवश्यकतेनुसार.
3. आयुक्त सभा, वॉर्ड सभा, पदाधिकारी बैठका यांचे प्रक्षेपण आवश्यकतेनुसार.
4. महत्त्वाचे शासकीय कार्यक्रम, पुरस्कार वितरण सोहळे यांचे Live Coverage.
5. YouTube Channel वर Streaming सोबत Live Chat Monitoring.
6. Facebook Page वर एकाच वेळी Simultaneous Streaming.
7. Streaming नंतर Video Recording Edit जमा करणे.
8. थेट प्रक्षेपण अयशस्वी झाल्यास Backup Arrangement उपलब्ध असणे.
9. Monthly Report सादर करणे (Views, Reach, Engagement Statistics सह).

### ४.२ तांत्रिक उपकरणे (किमान आवश्यकता)

| अ.क्र. | उपकरणाचे नाव | किमान संख्या | तांत्रिक वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| १ | Professional Video Camera | ३ | Full HD / 4K, Low-light capable |
| २ | Live Streaming Encoder | १ | Hardware/Software Encoder, Multi-platform |
| ३ | Professional Mixer / Switcher | १ | Multi-input, Audio-Video |
| ४ | Lighting Equipment | १ Set | LED Panel Lights |
| ५ | Tripod / Camera Stand | २ | Professional Grade |
| ६ | Laptop / Desktop for Streaming | १ | i5/i7, 8GB RAM, Win 10+ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | UPS / Power Backup | १ | मुख्य उपकरणांसाठी |

## भाग - ५: निविदेच्या अटी व शर्ती

### ५.१ निविदा शुल्क व EMD

- निविदा शुल्क: ₹ 500/- (विनापरतावा) Non Refundable
- Earnest Money Deposit (EMD): ₹ 5,000/- Demand Draft स्वरूपात भरावे.
- यशस्वी निविदाकाराची EMD Performance Security मध्ये रूपांतरित केली जाईल.
- इतर निविदाकारांची EMD काम सुरू झाल्यानंतर १५ दिवसांत परत केली जाईल.

### ५.२ Performance Security

- करार मूल्याच्या २% रक्कम Performance Security म्हणून भरावी लागेल.
- Bank Guarantee / DD स्वरूपात करार कालावधी + ६० दिवस वैध असावे.
- कार्यात कसूर झाल्यास Performance Security जप्त केली जाईल.

### ५.३ मूल्यांकन पद्धत (L1 Based Evaluation)

निविदांचे मूल्यांकन खालील दोन टप्प्यात होईल:

1. तांत्रिक बोली (Technical Bid): पात्रता निकष, अनुभव, उपकरणे, कर्मचारी तपशील यांचे मूल्यांकन.
2. आर्थिक बोली (Financial Bid): तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाकारांमधून सर्वात कमी दर (L1) निवडला जाईल.

(नोंद: केवळ तांत्रिक बोलीत उत्तीर्ण झालेल्या निविदाकारांचीच आर्थिक बोली उघडली जाईल.)

### ५.४ करार अटी

- करार कालावधी: एक वर्ष (दिनांक / /2026 ते / /2026 ),
- करार नोंदणी शुल्क निविदाकाराने सोसावे.

## भाग - ६: सेवा दर्जा आणि दंड तरतूद (SLA & Penalty)

| अ.क्र. | कसूर / Default | दंड / Penalty |
|---|---|---|
| १ | Streaming वेळेत सुरू न झाल्यास (१५ मिनिटांपेक्षा जास्त उशीर) | त्या सभेच्या देयकाच्या ५% |
| २ | Streaming तांत्रिक बिघाडामुळे ३० मिनिटांपेक्षा जास्त खंडित झाल्यास | त्या सभेच्या देयकाच्या १०% |
| ३ | Streaming संपूर्णपणे अयशस्वी झाल्यास | त्या सभेचे संपूर्ण देयक वजा |
| ४ | सभेनंतर ४८ तासांत Video Upload न झाल्यास | ₹ 500/- प्रति दिवस विलंब |
| ५ | Monthly Report वेळेत न सादर केल्यास | ₹ 500/- प्रति दिवस विलंब |
| ६ | एका वर्षात ३ पेक्षा जास्त कसूर झाल्यास | करार रद्द करण्याचा अधिकार |

## भाग - ७: देयक प्रक्रिया

- देयक मासिक आधारावर केले जाईल - प्रत्येक महिन्याच्या कामाचे देयक पुढील महिन्याच्या ७ तारखेपर्यंत सादर करावे. निधी उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.
- देयकासोबत Streaming Links, Screenshots, Analytics Report सादर करणे अनिवार्य आहे.
- संबंधित अधिकाऱ्याकडून कामाचे प्रमाणपत्र (Work Completion Certificate) मिळाल्यानंतर देयक प्रक्रिया केली जाईल.
- TDS कपात नियमानुसार केली जाईल.
- GST देयक Tax Invoice सादर करणे.
- देयक Check / RTGS / NEFT द्वारे थेट बँक खात्यात जमा केले जाईल.
- सेवा आदेश सभा निहाय, Record Maintain ठेवणे

## भाग - ८: आवश्यक कागदपत्रे (Documents Required)

### ८.१ तांत्रिक बोलीसाठी (Technical Bid Envelope)

1. संस्था / फर्म नोंदणी प्रमाणपत्र (Registration Certificate)
2. GST नोंदणी प्रमाणपत्र (असल्यास)
3. PAN Card
4. मागील ३ वर्षांचे CA प्रमाणित Balance Sheet व ITR
5. अनुभव प्रमाणपत्रे (Work Order + Completion Certificate - किमान १)
6. तांत्रिक उपकरणांची यादी (Ownership/Rental Agreement सह)
7. कर्मचाऱ्यांची यादी (CVs सह)
8. काळ्या यादीत नसल्याबाबत Self-Declaration
9. EMD रक्कम जमा केल्याचा पुरावा
10. निविदा शुल्क भरल्याचा पुरावा
11. YouTube / Facebook Channel Links (मागील कामाचे)
12. निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्या बाबत शपथपत्र / घोषणापत्र
13. सादर केलेली माहीती व कागदपत्रे खरी व परिपूर्ण असले बाबत शपथपत्र/ घोषणापत्र
14. अधिकारी / कर्मचारी / नगरसेवक यांच्याशी संबंध नसलेबाबत शपथपत्र / घोषणापत्र

### ८.२ आर्थिक बोलीसाठी (Financial Bid Envelope)

15. BOQ - भरलेला दर तक्ता (Digitally Signed)
16. GST सह एकूण वार्षिक अंदाजे खर्च

## भाग - ९: विवाद निवारण व कायदेशीर तरतूद

- या करारातून उद्भवणारे कोणतेही विवाद प्रथम आयुक्त, जालना मनपा यांच्याकडे सोपवले जातील.
- आयुक्त स्तरावर निराकरण न झाल्यास, सक्षम महाराष्ट्र शासन अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.
- कायदेशीर वाद उद्भवल्यास जालना न्यायालयाचे अधिकारक्षेत्र लागू राहील.

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ व लेखा संहिता २०१३ अंतर्गतच्या तरतुदी लागू राहतील.
- निविदाकाराने सादर केलेल्या माहितीत खोटेपणा आढळल्यास करार त्वरित रद्द करण्यात येईल व कायदेशीर कारवाई केली जाईल.

## भाग - १०: महत्त्वाच्या सूचना

- निविदा फक्त (Manual) सादर केलेला स्वीकारला जाणार.
- Pre-Bid Meeting ला उपस्थित राहणे अनिवार्य नाही, परंतु शिफारसीय आहे.
- मनपाला कोणतेही/ सर्व निविदा कारण न सांगता रद्द करण्याचा, स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येतो.
- अर्जाची कोणतीही अट पूर्ण न केल्यास निविदा बाद केली जाईल.
- सर्व वाद व करार व्यवहार मराठी किंवा हिंदी / इंग्रजी भाषेत असतील.

## भाग - ११: संपर्क माहिती

| | |
|---|---|
| **कार्यालय** | जालना शहर महानगरपालिका, मनपा मुख्यालय, जालना - 431203 |
| **संपर्क अधिकारी** | माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख / IT Head |
| **दूरध्वनी** | 02482-230350(कार्यालयीन वेळ: सकाळी 10 ते सायं. 05) |
| **ई-मेल** | comcjalna@gmail.com |
| **वेबसाईट** | https://jcmcjalna.org |

| | | | |
|---|---|---|---|
| **संगणक विभाग प्रमुख** | **मुख्य लेखापरिक्षक** | **मुख्य लेखाधिकारी** | **आयुक्त** |
| **जालना महानगरपालिका** | **जालना महानगरपालिका** | **जालना महानगरपालिका** | **जालना महानगरपालिका** |